# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar
# Date 09 August 2024
# Time 01.00 to 01.05 PM
# Language Marathi
## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर
## प्रादेशिक बातम्या
## दिनांक ०९ ऑगस्ट २०२४ दुपारी १.०० वा.

****

नॉन क्रिमिलेयर संदर्भात सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयाच्या पार्श्वभूमीवर भारतीय जनता पक्षाच्या अनुसूचित जाती – जमाती प्रवर्गातल्या खासदारांनी आज पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेतली. अनुसूचित जाती – जमातींना क्रिमेलियर लागू होणार नसल्याचा विश्वास पंतप्रधान मोदी यांनी खासदारांना दिला असल्याचं, याबाबतच्या वृत्तात म्हटलं आहे. अनुसूचित जाती, जमाती प्रवर्गात उपप्रवर्ग पाडता येऊ शकतात, असा निर्णय सर्वोच्च न्यायालयानं गेल्या आठवड्यात दिला होता.

****

देशाच्या स्वातंत्र्यासाठी सर्वस्व अर्पण करणाऱ्या महान क्रांतिकारकांच्या जाज्वल्यतेची स्मृती जपणारा ऑगस्ट क्रांती दिन आज पाळण्यात येत आहे. राष्ट्रपिता महात्मा गांधी यांनी नऊ ऑगस्ट १९४२ रोजी 'छोडो भारत' आंदोलनाची हाक दिली होती. हा स्वातंत्र्यासाठीचा अंतिम लढा होता. भारत छोडो आंदोलनात सहभागी झालेल्या स्वातंत्र्यसैनिकांना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आदरांजली वाहिली आहे.

****

हर घर तिरंगा अभियान आजपासून सुरु झालं. या अभियानाचा राज्यस्तरीय शुभारंभ मुंबईत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते झाला. घरोघरी तिरंगा अभियान हे देशाच्या स्वातंत्र्यासाठी स्वातंत्र्यसैनिकांनी केलेला त्याग आणि बलिदानाची आपल्याला सतत जाणीव करून देईल, या अभियानानं आता लोकचळवळीच स्वरूप घेतल असून यावर्षीही राज्यातल्या अडीच कोटी घरावर तिरंगा फडकवला जाणार असल्याचं मुख्यमंत्री यावेळी म्हणाले.

त्यापूर्वी मुख्यमंत्र्यांनी मुंबईतल्या ऐतिहासिक ऑगस्ट क्रांती मैदानात स्वातंत्र्यलढ्यात प्राणाची आहुती देणाऱ्या क्रांतिकारकांना हुतात्मा स्मृती स्तंभावर अभिवादन केलं.

तर, कार्यक्रमानंतर पदयात्रा आणि सायक्लोथॉनला हिरवा झेंडा दाखवून प्रारंभ केला. यानंतर मुख्यमंत्र्यांनी तिरंगा कॅनव्हास वर स्वाक्षरी केली, तसंच घरोघरी तिरंगा अभियानाच्या सेल्फी पॉईंटवर सेल्फी घेतला.
दरम्यान, हर घर तिरंगा अभियानानिमित्त आज लातूर, बीड तसंच कोल्हापूर इथं तिरंगा रॅली काढण्यात आली.

****

मद्य धोरण घोटाळ्याप्रकरणी सक्तवसुली संचालनालयाच्या कोठडीत असणारे आम आदमी पक्षाचे नेते मनिष सोसोदीया यांना सर्वोच्च न्यायालयाने जामिन मंजूर केला आहे. या प्रकरणात गेल्या १७ महिन्यांपासून कोणतीही सुनावणी होत नसल्या कारणाने सिसोदीया यांच्या जलदगतीने सुनावणी होण्याच्या हक्काचं हनन होत असल्याचं न्यायालयाने म्हटलं आहे. ईडी आणि सीबीआय या दोन्ही संस्थानी दाखल केलेल्या प्रकरणात न्यायालयाने सिसोदिया यांना जामिन दिला आहे.

****

आयसिसशी संबंधित दहशतवाद्याला दिल्ली पोलिसांच्या विशेष पथकानं आज पुण्यातून अटक केली. रिजवान आली असं त्याचं नाव असून तो दर्यागंजचा रहिवासी आहे. राष्ट्रीय तपास संस्था – एनआयएनं त्याच्यावर तीन लाख रुपयांचं बक्षीस जाहीर केलं होतं.

****

राज्यात अनेक ठिकाणी आज नागपंचमीचा सण उत्साहात साजरा होत आहे. या दिवशी वारुळाची देखील पूजा केली जाते. निसर्गातले सर्वच साप विषारी नसून, सापांविषयी समाजामध्ये पसरलेल्या विविध गैरसमजांबाबत, अनेक सर्पमित्र नागपंचमीच्या निमित्तानं जनजागृती करत असतात.
नागपंचमी निमित्त धुळे जिल्ह्यातल्या निमगुळ इथं आज अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या वतीने सापासंदर्भात भित्तीचित्रकाद्वारे जनजागृती करण्यात आली. शेतकऱ्यांचं आणि सापाचं नातं अधिक वृद्धिंगत व्हावं, तसंच सापाबद्दलचे समज–गैरसमज, अंधश्रद्धा दूर करून निसर्ग संतुलन राखण्यासाठी सर्प संरक्षणाची गरज असल्याचं मत, अंधश्रद्धा निर्मुलन समितीचे धुळे जिल्हा पदाधिकारी दिलीप खिवसरा यांनी यावेळी व्यक्त केलं.

****

हिंगोली शहरातल्या क्रांतीसुर्य बिरसा मुंडा चौकात जागतिक आदिवासी दिनानिमित्त बिरसा मुंडा यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आलं. माजी

आमदार संतोष टारफे यांच्यासह मोठ्या संखेने आदिवासी समाज बांधव यावेळी उपस्थित होते.

****

नांदेड जिल्ह्यात आगामी विधानसभा निवडणुकीसाठी प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध झाली आहे. २० ऑगस्टपर्यंत मतदारांना नाव नोंदणी, तसंच हरकती दाखल करता येणार आहेत. त्यासाठी जिल्ह्यात उद्या १० ऑगस्ट, ११ ऑगस्ट, तसंच १७ आणि १८ ऑगस्ट रोजी विशेष मतदार नोंदणी अभियान राबवण्यात येणार असल्याची माहिती जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांनी दिली.

****

वाशिम जिल्ह्यात मंगरुळपिर इथं पोलिसांनी कत्तलीसाठी नेल्या जाणार्या जनावरांची सुटका केली. चेहलपुरा भागात जनावरे बांधून ठेवल्याची माहिती पोलीस निरीक्षक सुधाकर आडे यांना मिळाली असता काल रात्री ही कारवाई करण्यात आली. यावेळी ८९ गोवंशीय जनावरांची सुटका करुन पाच लाख ९८ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

****

पॅरिस ऑलिम्पिक स्पर्धेत आज कुस्तीमध्ये पुरुषांच्या ५७ किलो वजनी गटात अमन सहरावत कांस्य पदकासाठी खेळणार आहे. भारतीय वेळेनुसार रात्री पावणे दहा वाजता हा सामना सुरु होईल.

****